03 MAR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात एका वर्षात मोती पिकला हो..!

## मोत्यांच्या शेतीचा प्रयोग अपेक्षेपलीकडे यशस्वी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने गतवर्षी २८ फेब्रुवारी रोजी गोड्या पाण्यातील मोत्यांच्या शेतीचा प्रयोग हाती घेतला. हा मोती पिकवण्याचा प्रयोग अपेक्षेपलीकडे यशस्वी झाला असून, एका वर्षात मोती निर्माण करण्यात संशोधकांना यशही आले आहे. विद्यापीठात पिकलेला पहिला मोती महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते भेट देण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे समन्वयक तथा प्राणी शास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे यांनी गेल्या वर्षभरात या केंद्रामध्ये झालेल्या संशोधनाविषयी, तसेच प्राप्त झालेल्या यशाबद्दल तपशीलवार दिलेल्या माहितीनुसार, २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्राणिशास्त्र अधिविभागाच्या परिसरात गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. केंद्राने महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या मान्यतेने या ठिकाणी गोड्या पाण्यातील मोत्यांविषयी संशोधन व विकासाचे काम सुरू केले. मोती या क्षेत्रातील यशस्वी प्रयोगशील उद्योजक दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर प्राण्यांचे संगोपन करण्यास सुरुवात केली. योग्य देखभाल आणि संवर्धनामुळे या शिंपल्यांपासून चांगल्या प्रकारचे मोती साकार होऊ लागले आहेत. त्यातील साधारण बारा महिन्यांचा पहिला मोती कुलपतींना कुलगुरूंच्या हस्ते भेट देण्यात आला. काही मोती शिंपले १८ महिन्यांपर्यंत ठेवण्यात येणार आहेत.

डॉ. कांबळे म्हणाले, गतवर्षी आम्ही पाण्यात संवर्धनासाठी सोडलेल्या १०० शिंपल्यांमधील मृत्युदर अवघा २० टक्के इतका आढळला. सर्वसाधारणपणे यांचा मृत्युदर हा ४० टक्क्यांच्या घरात असतो. तो कमी करण्यात आपल्याला यश आले. त्यासाठी आपण पाण्याच्या टाकीमधील पाणी नदीप्रमाणे प्रवाही राखले. पाण्यातील ऑक्सिजनची पातळी सातत्याने कायम राखली. आवश्यक त्या प्रमाणात अन्नपुरवठा केला. दरमहा तीन प्राण्यांचे निरीक्षण केले आणि त्यांचे निष्कर्ष नोंदवले. प्राण्याचे वय, वजन, त्याची संवेदनक्षमता आदी गुणधर्मांचाही अभ्यास केला. प्री-ऑपरेटिव्ह, ऑपरेटिव्ह आणि पोस्ट ऑपरेटिव्ह या तिन्ही टप्प्यांमधील सर्व प्रक्रिया जंतुसंसर्गविरहित पद्धतीने होतील, याचीही दक्षता घेतली. हे या प्रयोगाचे महत्त्वाचे यश आहे.





१) कोल्हापूर : पहिला मोती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना भेट देताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत वरिष्ठ अधिकारी. २) गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे आणि दिलीप कांबळे.

### मोत्यांचा इतिहास आणि निर्मिती

डॉ. कांबळे यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीमध्ये मोत्यांचे महत्त्व केवळ अलंकार म्हणूनच नव्हे, तर आयुर्वेदातही ठळकपणे नमूद आहे. समुद्रातील शिंपल्यांपासून मोती तयार होत असल्याचे अनेक ठिकाणी ऐतिहासिक संदर्भ सापडतात. चीनमधील शांघाय प्रदेशात गोड्या पाण्यातील शिंपल्यांसह संवर्धित मोती तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले. तेव्हापासून चीन जगातील सर्वात मोठा गोड्या पाण्यातील मोती संवर्धक व उत्पादक देश बनला. चीनमध्ये दरवर्षी १५०० मेट्रिक टनांपेक्षा जास्त मोती उत्पादन होते. महत्त्वाचे म्हणजे नेक्रियस मोती प्रामुख्याने मोलस्कन बायव्हल्व्ह किंवा क्लॅमच्या दोन गटांद्वारे तयार केले जातात. सर्व कवचयुक्त मोलस्क नैसर्गिक प्रक्रियेद्वारे जेव्हा एखाद्या त्रासदायक सूक्ष्म वस्तूला सामोरे जातात, तेव्हा ते प्राण्यांच्या आवरणाच्या पटांमध्ये अडकल्याने नेक्रियस थर स्रवतात. अशा जिवंत प्राण्यांमध्ये मानवी हस्तक्षेपाशिवाय (नैसर्गिकरीत्या) किंवा हस्तक्षेप करून (कृत्रिमरीत्या) वेगवेगळ्या प्रमाणात आणि विविध क्षमतेचे चमकदार मोती तयार केले जातात, असेही त्यांनी सांगितले.

### कमी भांडवलात उत्तम व्यवसायाची शक्यता

डॉ. नितीन कांबळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांचे या उपक्रमात भरीव योगदान व कष्ट आहेत. विभागातील भाग-२ चे विद्यार्थी नवीन शैक्षणिक धोरणास अनुसरून ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य आधारित उपक्रम म्हणून मोती संवर्धन केंद्राच्या संशोधन व विकास कार्यात सहभाग नोंदवत आहेत. या प्रकल्पावर पीएच.डी.चे संशोधनही सुरू आहे. केवळ जागा अगर कृत्रिम वा नैसर्गिक तलाव आणि प्राथमिक २५ ते ३० हजारांच्या गुंतवणुकीतून १२ ते १८ महिन्यांच्या कालावधीत ३ ते ४ लाखांचे उत्पन्न मिळू शकते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2025
पुढारी


# शिवाजी विद्यापीठात आजपासून शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग यांच्या वतीने शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे ३ ते ७ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली. शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे सोमवार (दि. ३) रोजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एच. ठकार, अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन प्रमुख उपस्थित राहणार आहेत. महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2025

सकाळ

# ‘काजवा’ लघुपटाने ‘स्पार्क’ची सांगता



कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमांतर्गत दोन दिवसीय स्पार्क चित्रपट महोत्सवाचा समारोप दिग्दर्शक उमेश बोळके यांच्या ‘काजवा’ लघुपटाने झाला.

या महोत्सवामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त आणि फिल्म फेअर पुरस्कारप्राप्त लघुपट आणि माहितीपटांचे स्क्रिनिंग करण्यात आले. त्यात पहिल्या दिवशी सचिन सूर्यवंशी यांच्या ‘वारसा’ आणि ‘सॉकर सिटी’, संजय दैव यांचा ‘देशकरी’, रोहित कांबळे यांचा ‘देशी’, मेधप्रणव पोवार यांची ‘हॅपी बर्थ डे’, नीतेश परुळेकर यांचा ‘बॅकयार्ड’ या लघुपट आणि माहितीपटांचे प्रदर्शन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी उमेश बगाडे यांची ‘अनाहूत’, सुधीर गुरव यांची ‘लागीर’, स्वप्नील पाटील यांचा ‘मधुबाला’ आणि उमेश बोळके यांच्या ‘काजवा’ या लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी दिग्दर्शकांनी उपस्थित विद्यार्थी आणि प्रेक्षकांशी आपल्या चित्रकृतींविषयी संवाद साधला.

बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी महोत्सवाचे संयोजन केले. दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी सहसंयोजन केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक दादासाहेब मोरे, साहित्यिका विमल मोरे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, माहिती अधिकारी वृषाली पाटील, राजेंद्र मोरे, चंद्रशेखर गुरव, विशाल कुलकर्णी, संदीप गावडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2025
पुढारी

# विद्यापीठात आजपासून गणित उपयोजनाबाबत राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात दि. ३ मार्चपासून 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन अॅप्लिकेबल मॅथेमॅटिक्स २०२५' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे बीजभाषण करतील. डॉ. एस. श्रीनिवास राव, डॉ. बी. उमा, डॉ. सचिनकुमार भालेकर, डॉ. बी. एस. देसले, डॉ. विनायक जोशी, डॉ. एस. ए. कात्रे आणि डॉ. एस. डी. नाईक यांची व्याख्याने होतील. ४५ संशोधक शोधनिबंध सादर करणार आहेत. परिषदेत उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे समन्वयक डॉ. सुनील कुंभार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2025

तरुण भारत



कोल्हापूर : व्यवस्थापन परिषदेचे संचालक सिद्धार्थ शिंदे यांचा सत्कार करताना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे सोबत रवींद्र मोरे, प्रवीण पाटील, कॉ. चंद्रकांत यादव, राजू हत्तर्गी आदी.

# राज्य अन्न आयोगातर्फे सिद्धार्थ शिंदेंचा सत्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे संचालक सिध्दार्थ शिंदे यांनी उच्च शिक्षणातील संशोधनासंबंधी सुचवलेल्या उपायांची केंद्रीय अर्थसंकल्पात दखल घेतली आहे. या पार्श्वभुमीवर राज्य अन्न सुरक्षा आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा सत्कार केला.

सिध्दार्थ शिंदे यांनी महापुर काळात कागल-सातारा महामार्गावर पाण्याचा निचरा होण्यासाठी सुचवलेले ३ आऊटलेट, ग्रामीण भागातील मोबाईल नेटवर्कची समस्या, लिआयन बॅटरीची विल्हेवाट यासह विविध मुद्द्यांवर केंद्र सरकारशी पत्रव्यवहार केला होता. त्याची दखल केंद्रीय अर्थसंकल्पात घेण्यात आली. त्याबद्दल राष्ट्रीय विज्ञान दिनाचं औचित्य साधून राज्य अन्न सुरक्षा आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रेशन धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष रवींद्र मोरे, चंद्रकांत यादव, निवृत्ती दिवेकर, प्रवीण पाटील, राजू हत्तरकी, अमोल रांगोळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAR 2025
सकाळ

# प्रतीक मगदूमची विद्यापीठ संघात निवड



इचलकरंजी : येथील डीकेएएससी कॉलेजचा खेळाडू प्रतीक मगदूम याची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. प्रतीकने श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेत ६० किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. या गटात एकूण १० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. प्रतीकची केरळ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. त्याला शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.